# मधुमेही ब्रजेंद्रच्या आयुष्यात पुन्हा गोडवा

मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) – औषधोपचार घेऊनही मधुमेह नियंत्रणात न आलेल्या एका रुग्णावर मुंबई रुग्णालयातील डॉक्टरांनी 'इलियल इंटरपोझिशन' शस्त्रक्रिया करून त्याच्या मधुमेहावर नियंत्रण आणले. हिंदुस्थानातील अशाप्रकारची ही पहिलीच शस्त्रक्रिया आहे.

पन्नाशीतल्या ब्रजेंद्र सिंग या रुग्णावर मुंबई रुग्णालयात डॉ. रमण गोयल यांनी ही शस्त्रक्रिया केली. ब्रजेंद्र हे टाईप-२ मधुमेहाने त्रस्त होते. एलपीजी सिलिंडरवाहक म्हणून काम करणारे ब्रजेंद्र यांना औषधोपचारासाठी महिन्याला दोन हजार रुपये लागायचे. मधुमेहामुळे त्यांची किडनी आणि डोळ्यांवरही परिणाम झाला होता.

डॉ. गोयल यांनी गेल्या ४ ऑक्टोबरला ब्रजेंद्र यांच्यावर इलियल इंटरपोझिशन शस्त्रक्रिया केली. अन्न गिळल्यानंतर ते छोट्या आतड्यांमधून मोठ्या आतड्यांपर्यंत पोहोचण्यास सुमारे दीड तास लागतो. तोपर्यंत मधुमेही रुग्णामधील साखरेचे प्रमाण वाढून इन्सुलिन निर्मितीला अवरोध होतो. ब्रजेंद्र यांच्यातही हीच समस्या दिसून आली.

लॅप्रोस्कोपीद्वारे डॉ. गोयल यांनी ब्रजेंद्र यांच्यावर इलियल इंटरपोझिशन शस्त्रक्रिया करून त्यांच्या मोठ्या आतड्याची जागा बदलली. ते

- मुंबई रुग्णालयात यशस्वी शस्त्रक्रिया
- देशात इलियल इंटरपोझिशन शस्त्रक्रिया प्रथमच

जठराजवळ आणून जोडले गेले, जेणेकरून जठरामधून अन्न थेट त्यांच्या मोठ्या आतड्यामध्ये पोहोचेल. परिणामी साखर वाढण्यावर नियंत्रण आणता आले, असे डॉ. गोयल यांनी सांगितले. अशाप्रकारे ब्रजेंद्र यांचा मधुमेह नियंत्रणात आणला गेला.

जगामध्ये अशी शस्त्रक्रिया करणारी फक्त तीन अधिकृत केंद्रे आहेत. त्यात मुंबई रुग्णालयाचा समावेश होतो.